# आमच्या अध्यक्षांचे गुंतवणूकदारांसाठी पत्र.

## विषय: आमच्या फंड्सबद्दल मीडियामधील बातम्यांबद्दल स्पष्टीकरण

प्रिय गुंतवणूकदार,

आज मी स्वतः आपल्याला पत्र लिहीत आहे, कारण काही मीडिया चॅनल्सवरून सद्भावनेने केलेल्या, पण चुकीच्या रिपोर्टिंगमुळे काळजी करण्यासारखी परिस्थिती निर्माण झालेली आहे. मी आपल्याला मुद्देवार माहिती देऊ इच्छितो:

### 1: बातमी: स्किम बंद करणे याचा अर्थ असा होतो की माझे सर्व पैसे बुडाले आहेत

**वस्तुस्थिती:** हा समज चुकीची आहे. आम्हाला हा अतिशय कठोर निर्णय का घ्यावा लागला याला कारणीभूत असलेल्या बाजाराच्या परिस्थितीबद्दल आणि कारणांबद्दल आम्ही आधी कळवलेले आहे. हा निर्णय घेण्यामागचे कारण फक्त गुंतवणूकदारांच्या पैशाचे संरक्षण करणे हेच होते. बाजारातील परिस्थितीप्रमाणे जसजशा स्किमच्या पोर्टफोलिओमधील होल्डिंग विकल्या जातील, त्यावरील कूपन प्रमाणे आणि नियोजित मॅच्युरिटीप्रमाणे स्किमला पैसे मिळत जातील, तसतसे सेबी (म्युच्युअल फंड) विनियम 1996 मधील नियम 41(2) (b) प्रमाणे ट्रस्टी गुंतवणूकदारांना पैसे परत करण्याचे काम लवकरात लवकर सुरू करतील.

### 2: बातमी: स्किममधील गुंतवणूक अतिशय जोखीम असलेल्या, रेटिंग नसलेल्या रोख्यांमध्ये केली गेली होती

**वस्तुस्थिती:** गुंतवणुकीसाठी स्किममध्ये एक सुसंगत अशा गुंतवणूक नीतीचे पालन केले गेले होते ज्यात गुंतवणुकीसाठी योग्य अशा विविध क्रेडिट रेटिंग असलेल्या, म्हणजेच AAA पासून A रेटिंगच्या रोख्यांमध्ये गुंतवणूक केली गेली होती. हल्लीच्या काळात या नीतीने स्किम आणि त्यांतील गुंतवणूकदारांना चांगला परतावा मिळवून दिलेला आहे. क्रेडिट बाजारासाठी अतिशय धकाधकीच्या गेल्या 6 महिन्यांच्या काळात सुद्धा स्किमने उल्लेखनीय परतावा मिळवलेला आहे. उदाहरणार्थ, अशा पोर्टफोलिओ होल्डिंगमधून स्किमने उल्लेखनीय परतावा मिळवलेला आहे, ज्यांत रोख्यांचे रेटिंग AA किंवा त्यापेक्षा खालचे होते.

### 3: बातमी: लिक्विडिटीची समस्या Covid-19च्या साथीशी निगडित नाही

**वस्तुस्थिती:** या स्किमने एक सुसंगत अशा गुंतवणूक नीतीचे पालन केले होते ज्यात विविध क्रेडिट रेटिंग असलेल्या रोख्यांमध्ये गुंतवणूक केली गेली होती आणि हे काम वर्षानुवर्षे, सर्व प्रकारच्या बाजार-चक्रांमध्ये सुरू आहे. या स्किमने या सर्व चक्रांमध्ये काम निभावून नेले आहे आणि दैनिक लिक्विडिटी दिलेली आ

अशाच नीतीचे अनुसरण करणाऱ्या या पैकी अनेक स्किम तर 10 वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून सुरू आहेत. सध्याच्या Covid-19 च्या साथीने विशेषकरून या स्किममधील गुंतवणुकींसाठी बाजारात एक नकारात्मक प्रभाव निर्माण केला, जोखीम पत्करण्याची इच्छा कमी होणे, बाजारातील कारभार कमी होणे आणि कॉर्पोरेट बॉंडची लिक्विडिटी कमी होणे ही एकूण बाजारावर प्रभाव टाकणारी कारणे होती. या स्किममध्ये

दैनिक रेडेम्पशनसाठी पैसा नाही पुरणे ही परिस्थिती COVID-19 मुळे, तसेच वाढत गेलेल्या लॉकडाउनच्या परिस्थितीमुळे निर्माण झाली होती.

### 4: बातमी: या स्किममधील पैसा बराच काळ गुंतवणूकदारांना परत मिळण्याची शक्यता दिसत नाही

**वस्तुस्थिती:** प्रत्येक स्किमचा स्वतःचा परिपक्वता प्रोफाइल आहे आणि साधारणपणे, कमी कालावधीच्या स्किमचा पैसा गुंतवणूकदारांना लवकर मिळू शकेल. या स्किमना नियमितपणे कूपन दराने पैसे आणि परिपक्वतेचे पैसे मिळत राहातील. तसेच, या स्किम आपल्या पोर्टफोलिओमधील मालमत्तेचे पैशांत रूपांतरण करण्याचे सर्व मार्ग पडताळून पाहातील, पण कुठल्याही परिस्थितीत ती मालमत्ता विकायचीच आहे असे नाही, जेणेकरून गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे लवकरात लवकर परत करता येईल. या स्किमचा प्रयत्न हाच राहील की यातील रोख्यांच्या परिपक्वतेच्या तारखेच्या आधी सर्व पैसे परत केले जावेत.

### 5: बातमी: आम्हाला फ्रँकलिन टेंपलटनच्या इतर सर्व स्किममधून आपले पैसे काढून घ्यायला पाहिजेत कारण त्या सुद्धा बंद होऊ शकतात

**वस्तुस्थिती:** आमच्या सहा परतावा-उन्मुख(फायदेशीर) स्किमना बंद करण्याचा निर्णय घेणे फार कठीण होते आणि हा निर्णय घेताना फक्त गुंतवणूकदारांचे हित लक्षात ठेवले गेले आहे. ही अशी परिस्थिती नव्हती जिची आम्ही कल्पना केली होती. आम्हाला ही जाणीव आहे की यामुळे आमच्या गुंतवणूकदारांच्या लिक्विडिटीला धक्का बसला आहे, पण हा निर्णय घेणे आमच्या युनिटधारकांच्या पैशाचे संरक्षण करण्यासाठी गरजेचे होते.

आमच्या इतर स्थिर मिळकत स्किम सब्सक्रिप्शनसाठी आणि रिडीम करण्यासाठी खुल्या आहेत, या स्किममध्ये मुख्यत्वे शासकीय सिक्योरिटीज, AAA रेटिंग असलेले बाँड किंवा इतर रोख आणि रोख-समकक्ष यांत गुंतवणूक केलेली आहे. या पोर्टफोलिओमध्ये रिडीम करण्याच्या गरजांसाठी लिक्विडिटी निर्माण करण्याची क्षमता आहे. आम्ही या पोर्टफोलिओमध्ये आधीच उत्तम प्रकारे लिक्विडिटी निर्माण करून ठेवलेली आहे जेणेकरून आम्हाला भविष्यात मिळू शकणाऱ्या रिडीम करण्याच्या विनंतींसाठी आम्ही सज्ज आहोत.

आमच्या इक्विटी स्किमवर काहीही प्रभाव पडलेला नाही आणि त्यांचे व्यवस्थापन त्यांच्या-त्यांच्या गुंतवणूक उद्दिष्टांप्रमाणे आणि फंड व्यवस्थापनाच्या विचारसरणीप्रमाणे आमच्या अनुभवी आणि दीर्घ कालापासून काम करीत असलेल्या चेन्नई येथील टीमच्या हातांत आहे.

### 6: बातमी: फ्रँकलिन टेंपलटन भारतातील आपला व्यवसाय बंद करीत आहेत

**वस्तुस्थिती:** फ्रँकलिन टेंपलटन भारतात फार पूर्वीपासून आणि संयमाने गुतंवणूक करीत आहेत. आम्ही भारतात आपल्या मेहनतीने गेल्या 25+ वर्षांमध्ये आमचा व्यवसाय वाढवला आहे. याचे आणखी एक भक्कम उदाहरण म्हणजे जग भरातील आमच्या कर्मचाऱ्यांपैकी 33% कर्मचारी भारतात आहेत. आमच्या वैश्विक सीईओ जेनी जॉनसन यांनी सांगितल्याप्रमाणे, फ्रँकलिन टेंपलटनची भारतातील प्रतिबद्धता तशीच टिकून राहाणार आहे. बंद केल्या गेलेल्या स्किममधील पैसे लवकरात लवकर गुंतवणूकदारांना परत करणे हेच आमचे ध्येय आहे, तसेच आमच्या ब्रँडमध्ये आपला विश्वास परत मिळवणे हे सुद्धा आमचे ध्येय आहे.

आम्ही तयार केलेल्या सहा योजना बंद करण्याचा निर्णय खूपच कठीण होता आणि हा निर्णय घेण्यात आला, कारण आजच्या अभूतपूर्व परिस्थितीमध्ये आमच्या गुंतवणूकदारांच्या पैशाचे संरक्षण करण्याचा हाच एकमेव मार्ग होता.

मला आशा वाटते की या पत्राने आपल्याला फ्रँकलिन टेंपलटन मधील आपल्या गुंतवणुकींबद्दल थोडा दिलासा मिळेल, ती गुंतवणूक बंद करण्यात आलेल्या स्किममध्ये असो, किंवा सब्सक्रिप्शन आणि रिडीम करण्यासाठी खुल्या अशा आमच्या इतर स्किममध्ये असो.

आपल्या तातडीच्या आणि महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी आणि आपल्याला नियमितपणे अपडेट देत राहाण्यासाठी मी प्रतिबद्ध आहे.

जर आपल्याला कुठल्याही प्रकारच्या मदतीचा गरज असेल, तर आमच्या समर्पित हेल्पलाइन वर 1-800-258-4255 वर किंवा 1-800-425-4255 वर सोमवार ते शनिवार सकाळी 8 ते रात्री 9 वाजेपर्यंत आपण कॉल करू शकता. किंवा आपण आम्हांला service@franklintempleton.com वर

ईमेल सुद्धा करू शकता. आम्हाला आपल्याशी बोलायला आवडेल.

धन्यवाद.

आपला विश्वासू,

संजय

------------------

**संजय सप्रे**

अध्यक्ष

**Franklin Templeton Asset Management (India) Pvt. Ltd.**

---

**अस्वीकरण**

या पत्रातील माहिती प्रत्येक महत्त्वाच्या तथ्याचा संपूर्ण खुलासा नाही आणि ही माहिती फक्त माहिती पुरवण्याच्या हेतूने दिलेली आहे. यातील विधाने/ मते/ शिफारसी, ज्यांत "करू" "अपेक्षा करतो", "शक्यता" "वाटते" आणि या प्रकारचे इतर शब्द आहेत किंवा त्या शब्दांची इतर रूपे आहेत, ती "भविष्योन्मुख विधाने" आहेत. वास्तविक परिणाम "भविष्योन्मुख विधानांत" सांगितलेल्यापासून सर्वथा निराळे असू शकतात आणि याचे कारण आहे बाजाराचा जोखीम, भारतातील आणि जगातील इतर देशांतील सामान्य आर्थिक आणि राजनैतिक परिस्थिती साठी, पण एवढ्यावरच मर्यादित नाही, असलेल्या आमच्या अपेक्षांसोबत असलेली जोखीम, ज्याचा प्रभाव सेवा आणि/ किंवा गुंतवणुकींवर पडतो. या पत्राच्या तारखेनंतर परिस्थितीमध्ये काही बदल घडू शकतात, ज्यांचा प्रभाव सुरक्षेवर पडू शकतो. मालमत्ता व्यवस्थापन कंपनी, ट्रस्टी, त्यांचे सहकारी, ऑफिसर किंवा कर्मचारी किंवा होल्डिंग कंपनी हे आश्वासन किंवा गॅरंटी देत नाहीत की या स्किममधील गुंतवणुकींचे मुद्दल परत केले जाईल किंवा मिळकतीचे आश्वासन देत नाहीत. कृपया गुंतवणुकीचा निर्णय घेण्यापूर्वी स्किम इन्फर्मेशन डॉक्युमेंट संपूर्णपणे वाचा आणि आधिक माहितीसाठी आमच्या वेबसाइटला भेट द्या http://www.franklintempletonindia.com.

म्युच्युअल फंडातील गुंतवणूक ही बाजारातील जोखीमीच्या अधीन आहेत, योजनेसंबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.